महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमी, मुंबई वर कार्याध्यक्षांची नियुक्ती करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
अल्पसंख्याक विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः उसाअ २०१८/प्र.क्र.२९६/कार्यासन-५

मादाम कामा रोड, राजगुरु हुतात्मा चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: - ०८ ऑगस्ट, २०१९

वाचा:-

१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.ईयुए-१०७५/एल-जेजे, दि.१६ एप्रिल, १९७५
२) शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग क्रमांकः उअ-२००७/प्र.क्र.५(अ)/ सां.का.५, दि.२६.१२.२००७.
३) शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग, क्रमांकः उसाअ २०१४/प्र.क्र.२३३/कार्यासन-४ दिनांक २१ जानेवारी, २०१५.
४) शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग, क्रमांकः उसाअ २०१४/प्र.क्र.२३३/कार्यासन-४ दिनांक ३१ ऑगस्ट, २०१५.

प्रस्तावना:-

राज्यामध्ये उर्दू भाषेचा विकास, भाषेचे संवर्धन, प्रगती तसेच उर्दू व मराठी भाषेतील साहित्यिकांमध्ये वैचारीक आदान प्रदान होऊन राष्ट्रीय एकात्मतेची भावना दृढ व्हावी या उद्देशाने संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमीची स्थापना करण्यात आली होती. तद्नंतर महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमीची वेळोवेळी पुनर्रचना करण्यात आली आहे. संदर्भ क्र.४ येथील शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमीवर कार्याध्यक्ष पदी नियुक्त करण्यात आलेले श्री. रऊफ खान माजिद खान, खडका रोड, भुसावळ, जळगांव यांचे निधन झाल्याने महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमीवर कार्याध्यक्ष यांची नेमणूक करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

शासन निर्णय:-

महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमी, मुंबई च्या कार्याध्यक्ष पदी डॉ. मुशफ्फी अहमद सिध्दिकी उर्फ डॉ. राणा, राहणार मिरा रोड, जिल्हा ठाणे यांची नेमणूक करण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे. महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमीवर नियुक्त करण्यात आलेल्या उपरोक्त कार्याध्यक्षांचा नियुक्तीचा कालावधी सदर अकादमीची प्रत्यक्ष पुनर्रचना होईपर्यंत राहील. तथापि, अशासकीय सदस्यांच्या नियुक्त्या केंव्हाही संपुष्टात आणण्याचे अधिकार शासनास राहतील. अशासकीय सदस्यांची नियुक्ती शासनाकडून रद्द करण्यात आल्यास अकादमीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व शासकीय सदस्य हे अकादमीचे कामकाज पुढे चालू ठेवतील व पर्यायाने अकादमीचे अस्तित्व पुढे चालू राहील.

२. महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमी ही उर्दू भाषेच्या सर्वांगिण विकासासाठी कार्य करेल, त्याचप्रमाणे राज्य भाषा मराठी व उर्दू या दोन भाषांमध्ये भाषांतराद्वारे अन्य साहित्यिकी प्रयत्नाने कल्पनांची देवाण-घेवाण करण्यासाठी विविध योजना कार्यान्वित करेल. उक्त अकादमीच्या विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्याची जबाबदारी महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमीच्या कार्यालयाची असेल. अर्थात या

कार्यक्रमांसाठीं अकादमीच्या अध्यक्ष/ उपाध्यक्ष/कार्याध्यक्षाच्या मार्गदर्शनानुसार व सहकार्याने तसेच प्रचलित शासकीय नियमांनुसार विहित पध्दतीचा अवलंब करुन कार्यक्रमांचे आयोजन करण्याची वा त्यासाठी अनुज्ञेय निधीचा खर्च करण्याची जबाबदारी अकादमीच्या अधिकाऱ्यांची राहील.

३. महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमीवर नियुक्त केलेल्या सदस्यांना शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.प्रवास १०१०/प्र.क्र.२/सेवा-५,दि.०३/०३/२०१० च्या परिच्छेद क्र.१२ अन्वये राज्य स्तरावरील समिती/ मंडळ/आयोग यावर नियुक्त केलेल्या अशासकीय सदस्यांना अनुज्ञेय ठरविण्यात आलेल्या दरांनी प्रवास भत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहील. प्रवास देयकावर प्रति स्वाक्षरी करण्याचे अधिकार शासन नियुक्त करेल त्या आहरण व संवितरण अधिकारी, अल्पसंख्यांक विकास विभाग,यांना असतील.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेताक २०१९०८०८१५१५१६१२१४ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Shyam Arjunrao Tagade

Digitally signed by Shyam Arjunrao Tagade
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Minorities Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ebdccd1ea7bd29723d76653e72dddcc5cf97ff4fb69ce412d0d3c6d5c23adc3e, cn=Shyam Arjunrao Tagade
Date: 2019.08.08 17:32:35 +05'30'

(श्याम तागडे)

प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा सदस्य/विधानपरिषद, विधानभवन,मुंबई-३२
२. सर्व मा. विधानसभा सदस्य/विधानपरिषद सदस्य
३. मा.राज्यपालांचे सचिव,
४. मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
५. मा.मंत्री (अल्पसंख्यांक) यांचे खाजगी सचिव,
६. मा.राज्यमंत्री (अल्पसंख्यांक) यांचे खाजगी सचिव,
७. सर्व मा.मंत्री/मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
८. मा.मुख्य सचिव, यांचे सह सचिव, मंत्रालय, मुंबई,
९. महालेखापाल १/२ (लेखा परिक्षा), (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर.
१०. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
११. निवासी लेखा अधिकारी, मुंबई
१२. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई (प्रसिध्दीसाठी)
१३. संचालक, लेखा व कोषागारे (संगणक कक्ष), नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालय, मुंबई
१४. सह सचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
१५. अवर सचिव (का-५), अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
१६. डॉ. मुशफ्फी अहमद सिद्दिकी उर्फ डॉ. राणा, राहणार बी.-५०२, मक्युरी अपार्टमेंट, तनवर हॉस्पिटल जवळ, दिपक हॉस्पिटल लेन, मिरा भाईंदर रोड, मिरा रोड (पूर्व), जिल्हा ठाणे, पीन क्र. ४०११०७.
१७. सर्व समिती सदस्य, महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमी, मुंबई.
१८. अधिक्षक- नि- कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमी, मुंबई.
१९. निवड नस्ती/कार्यासन-५, संग्रहार्थ.